Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal    Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# वारकरी संत साहित्याची पार्श्वभूमी

**युवराज भास्करराव मुंडे**
संशोधक विद्यार्थी
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

**प्रस्तावना**

महाराष्ट्रातील महानुभाव पंथाबरोबरच वारकरी पंथाची वाटचाल सुरू होते. संत नामदेव व संत ज्ञानेश्वर या पंथाचे संस्थापक व प्रेरणास्थान होते. तत्कालीन समाजजीवनातील अनेक अप्रिय गोष्टींचे त्यांनी अवलोकन केले. शेवटी काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर यांच्या अधीन झालेली ही माणसे सत्य, शांती, विवेक, वैराग्य व आत्मिक समाधान या गुणांना पारखी होत आहेत, हे ज्ञानेश्वरांनी पाहिले. अशा परिस्थितीत या अज्ञानी, मोहवश लोकांना मार्गदर्शन करावयाचे असेल तर वैदिक धर्माची ओहोटी थांबवायची असेल तर भोळ्या भाबड्यांच्या धर्मभावनेला आध्यात्मिक विचारांची बैठक मिळवून देण्याशिवाय गत्यंतर नाही, अशा संत ज्ञानेश्वरांची खात्री पटली. दलितोद्धाराच्या प्रेरणेतून त्यांनी धर्मजागृतीचे कार्य हाती घेतले. भक्तीचा सरळ सोपा मार्गच जनउद्धार करू शकेल असे त्यांना वाटले आणि समाजातील सर्वच आबालवृद्धांना व जाती, पंथांना एकाच झेंड्याखाली आणून त्यांनी प्रथम एकमेकांपासून जातीय कटुतेने दुरावलेली मने एकत्र आणली ही सामाजिक क्रांतीच वारकरी पंथाच्या स्थापनेस पूरक ठरली. सर्व समाज या मोक्षाच्या सोप्या व सरळ मार्गाला अनुसरू लागला आणि पंढरीच्या विठ्ठलाला आपले आराध्य दैवत मानून भजन-कीर्तनांत रंगून भक्तीचा मळा फुलवू लागला आणि पाहता-पाहता वारकरी पंथ वाढत गेला.

वारकरी संप्रदायातील संतांनी मराठी समाजाला नवा विचार दिला. नवी जीवन निष्ठा दिली. विविध मानवी मूल्यातील समतोल व समन्वय साधून मराठी माणसांच्या जीवनाचे संरक्षण व संवर्धन केले. सर्वसामान्यांत आत्मविश्वास निर्माण करून मानवता, समता ही दृष्टी देऊन डोळस केले. हेच मध्ययुगीन कालखंडाचे वेगळेपण सांगता येईल. प्रस्तुत अभ्यासकाने या प्रकरणात महाराष्ट्र नावाच्या व्युत्पत्तीपासून सुरूवात केली आहे. मराठी भाषेची पूर्वपीठिका, मराठी वाङ्‌मयाचा आरंभ व आद्यग्रंथ सांगून तेराव्या शतकातील सामाजिक, राजकीय व धार्मिक परिस्थितीचे दर्शन करून दिलेले आहे. मध्ययुगीन कालखंडातील विविध संप्रदाय त्यामध्ये नाथ, महानुभाव, दत्त, समर्थ, नागेश व वीरशैव इत्यादी संप्रदायाचा परिचय करून दिलेला आहे. तसेच वारकरी संप्रदायातील विविध संताची तोंडओळख करून दिलेली आहे. त्यामध्ये ज्ञानेश्वर, नामदेव, सोपानदेव, मुक्ताई, गोरोबा, सावतामाळी, नरहरी सोनार, जोगा परमानंद, चोखामेळा, विसोबा खेचर, सेना न्हावी, परिसा भागवत, जगमित्र, नागा

व जनाबाई इत्यादी. त्याचबरोबर वारकरी संप्रदायाच्या वेगळेपणाचाही विचार प्रस्तुत प्रकरणात केलेला आहे. त्यामध्ये वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान, त्यांच्या निर्मिती प्रेरणा, आचारधर्म आणि समाजजीवनात वारकरी संप्रदायाचे स्थान इत्यादी या सर्व घटकांचा धावता धांडोळा या प्रकरणात घेतला आहे. त्याचे कारण असे की प्रस्तुत अभ्यासकाला येथे मध्ययुगीन साहित्याची पार्श्वभूमीचा अभ्यास करावायाचा आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. वारकरी संप्रदायाची संकल्पना जाणून घेणे.
२. वारकरी संत साहित्यांच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

**वारकरी संप्रदाय**

जगाच्या तुलनेत विचार करता भारतीय संस्कृती ही एक श्रेष्ठ संस्कृती मानली जाते. ही संस्कृती विकसनशील असल्या कारणाने क्रमाक्रमाने ती विकास पावत गेली. महाराष्ट्रातील भागवत धर्म हा विश्वव्यापक परमात्म्याच्या प्रकाशाची निर्गुण व सगुण स्वरूपात उपासना करणारा धर्म आहे. प्राचीन काळी भगवान श्रीकृष्णाने या धर्माचे पुनरुज्जीवन केले आणि म्हणूनच गीतेतील जे तत्त्वज्ञान आहे. तेच या धर्माचे तत्त्वज्ञान बनले. मध्ययुगीन कालखंडात संत ज्ञानेश्वरांने या धर्माचे संघटन केले आणि संत नामदेवांनी त्याचा प्रचार आणि प्रसार केला. या संघटन कार्यामध्ये अनेक संतांनी आपले योगदान दिले. अलीकडच्या काळात शं.दा. पेंडसे यांनी भागवत धर्माचे मूळ हे वैदिक धर्माशी नेऊन भिडविले आहे. ते म्हणतात की, "भग-सविता सुर्य विष्णु भगवान या परंपरेने श्री विष्णुच्या उपासनेचा मार्ग विकसित झाला."[१] पुढे मग श्रीविष्णु-श्रीकृष्ण-श्रीविठ्ठल यांच्या उपासनेचा भागवत धर्म मराठी संतांनी पुढे चालविला. जो भागवत धर्म नाम संकीर्तनावर आणि सदाचारावर उभा राहिलेला होता.

आजच्या काळाचा विचार करता या माहिती तंत्रज्ञानाच्या युगातही खेड्या व शहरात 'ज्ञानेश्वरी' व 'तुकाराम गाथा' हे दोन ग्रंथ अनेकांकडे पाहावयास मिळतात. कारण त्यातील 'भावसौंदर्य' व 'विचारसौंदर्य' हे कधीही भंग पावणारे नाही ते अभंग स्वरूपाचे आहे. त्यातील नित्यनूतनता ही अनेक अविष्कृत होताना दिसते व त्यातूनच सौंदर्य फुलत जाते. सद्यस्थितीत समाजात भांडणे, खून, मारामारी, चोरी, भ्रष्टाचार याचे पिक बहरास आले आहे व अहिंसा, सत्य, नैतिकता, प्रेम, माया यांचा लोप होत चालला आहे. समाजाची ही विस्कटलेली बिकट अवस्था पुन्हा बसवण्यासाठी व समाज शुद्धीकरणासाठी संतांच्या साहित्याची गरज आहे.

**महाराष्ट्रातील वारकरी परंपरा**

बाराव्या व तेराव्या शतकापासूनच वारकरी संप्रदाय हा इतर संप्रदायाच्या तुलनेत अधिक लोकप्रिय झाला. याचे यथायोग्य कारण म्हणजे सर्व धर्मियांना प्रवेश, स्त्री, पुरुष कोणताही असो त्याला

प्रवेश प्रपंच करूनही परमार्थ करता येतो ही शिथिलता या संप्रदायाचे तत्त्वज्ञान सामान्यांनाही समजेल उमजेल असे आहे. सामान्यातील सामान्य माणसाला आचारणात आणता येईल अशी आचारसंहिता आहे. आजच्या स्पर्धेच्या आणि विज्ञानयुगाच्या काळात ही लोक पंढरपूर आणि आळंदी येथे लाखोंच्या संख्येने जातात ही या संप्रदायाच्या लोकप्रियेची पावतीच म्हणावी लागेल. महाराष्ट्रातील काही मोजक्याच संताचा आढावा खालीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

**१.निवृत्तीनाथ**

संत ज्ञानदेवांचे निवृत्तिनाथ हे जेष्ठ बंधू आणि प्रत्यक्ष गुरु होत. इतर संताप्रमाणे निवृत्तिनाथांनीही अंभग रचना केली आहे. खऱ्या अर्थाने अभंगाची सुरुवातही त्यांच्यापासून झालेली आहे. मात्र त्यांच्या अभंगरचना ज्ञानेश्वरांच्या अभंग रचनेच्या तुलनेत तितकीशी प्रसिध्दी पावलेली नाही. तरी सुध्दा मराठी साहित्याच्या दृष्टीने निवृत्तिनाथांच्या अभंग रचनेचा आदर करणे क्रमप्राप्त आणि जरुरीचे आहे. त्यांच्या नावावर 'निवृत्तिसार', 'निवृत्तिदेवी' आणि 'उत्तरगीताटीका' असे तीन ग्रंथ सांगितले जातात. पण हे तिन्हीही ग्रंथ आजतरी उपलब्ध नाहीत. मातीला निवृत्तिनाथांच्या नावावर साडेतीनशे-चारशे अभंग पाहावयास मिळतात. प्रा. डॉ. र. रा. गोसावी यांनी संपादित केलेल्या ब्रह्मीभूत श्री. नाना महाराज साखरे प्रासादिक श्री सकल संतगाधा, खंड पहिला तिसऱ्या आवृत्तीमध्ये पान नंबर ३२ ते ६८ वर निवृत्तिनाथांचे एकूण ३५७ अभंग दिलेले आहेत. पंढरीमहिमा, बालक्रीडा, संतपर, उपदेशपर, नामपर, ज्ञानपर, कीर्तनपर, गुरुप्रसाद, पंढरपुरातील काला आदि विषयांवर निवृत्तीनांथानी अभंग रचना केलेली आहे.

सारांशपणे निवृत्तिनाथांच्या अभंगरचनेबाबत असे म्हणता येईल की, त्यांचे अभंग हे ज्ञानमय जरुर आहेत. पण काव्यदृष्ट्या आणि रचनादृष्ट्या मात्र ते तितकेसे प्रभावी वाटत नाहीत. म्हणजेच अंतरंगाच्यादृष्टीने ते ज्ञानदेवांच्या अभंगाच्या तोडीचे आहेत. परंतु मात्र ते त्या तोडीचे निश्चितच नाहीत. मात्र असे असले तरी "त्यांच्या अभंगातून व्यक्त होणारी नामस्मरणरूपी भक्ती ही परंपरेने गुरु गहिणीनांथांकडून आलेली होती. या अंकुराचाच वारकरी संप्रदायात वटवृक्ष होऊन, त्याच्या छायेखाली असंख्यांनी परमात्मसुखाचे अमृत चाखले. त्यांना मराठीतील आद्य अभंगकार म्हणावे लागते." या र.रा. गोसावी यांच्या अभिप्रायावरून निवृत्तिनाथांच्या अभंगलेखनाचे महत्त्व आपल्या लक्षात येते.

**२.संत ज्ञानेश्वर**

ऐतिहासिक दृष्टिकोणातून पाहिले तर वारकरी संप्रदाय हा वेदकाळापासून चालत आलेल्या भागवत धर्माचे किंवा भागवत संप्रदायाचेच एक विकसित रूप आहे. म्हणूनच वारकरी संप्रदायाला भागवत संप्रदाय असेही म्हटले जाते. या दृष्टीने ज्ञानेश्वर हे वारकरी संप्रदायाचे संस्थापक ठरत नाहीत.

"ज्ञानदेवांनी शुध्द भक्तितत्त्वावर अधिष्ठित असलेल्या या उपासनामार्गास तात्त्विक अधिष्ठान प्राप्त करून दिले. हाच बहिणाबाईच्या 'ज्ञानदेवे रचिला पाया 'या विधानातील आशय."[१] ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाला एक तात्त्विक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचे कार्य, लोकांना संघटीत करण्याचे व भोळ्या भाबड्या भक्तीला ज्ञानाची जोड प्राप्त करुन देण्याचे कार्य ज्ञानेश्वरांनी आपल्या ग्रंथाच्या आणि अभंग वाङ्मयाच्या माध्यमातून केलेले असल्यामुळे बहिणबाईनी त्यांच्याविषयी 'ज्ञानदेवे रचिला पाया' असे जे उद्गार काढले आहेत, ते अर्थपूर्ण आहेत.

ज्ञानेश्वराच्या पूर्वी समाजाला आध्यात्मिक क्षेत्रात कोणीही मार्गदर्शक नव्हता, अध्यात्म संस्कृतच्या तिजोरीत कडकोट बंदिस्त केले होते. सर्वसामान्यांना योग्य मार्गदर्शन करून परमार्थ स्वरुपाचे योग्य ज्ञान करून देऊन समाजाला वाटमार्गी लावण्याची जबाबदारी ज्यांच्यावर होती. ते एक तर सुखासिनतेच्या आहारी गेलेले होते किंवा व्रतवैकल्ये आणि कर्मकांड यामध्ये अडकून पडलेले होते. प्रा. निर्मल कुमार फडकुले म्हणतात त्याप्रमाणे "देव, धर्म, संस्कृती आणि साहित्य ही सारी क्षेत्रे वर्णीय उच्चतेच्या बळावर काही थोड्या लोकांनी शतकानुशतके आपल्या ताब्यात ठेवली होती. सर्वांचा पालनकर्ता परमेश्वरसुद्धा आपण ठरवून दिलेल्या चौकटीतच त्यांनी कोंडून ठेवला होता, पण भागवत संप्रदाय उदयाला आला आणि परिस्थितीत बदल होऊ लागला."[१४] आध्यात्मिक क्षेत्रात सर्वसामान्य माणसाची स्थिती भांबावून गेलेल्या माणसासारखी झालेली होती. धर्माच्या नावाखाली तो अनेक देवदेवतांच्या मागे लागलेला होता. संपूर्ण समाजाला अवकळा प्राप्त झाली होती. माणूस आपल्या धर्मकर्तव्याला विसरलेला होता. महाभारतात युद्ध प्रसंगी अर्जुनाच्या मनामध्ये युद्ध करावे की करू नये असा जो संभ्रम निर्माण होता, तशी संभ्रमित अवस्था समाजाची झाली होती. अर्जुनाच्या मनातील संभ्रम दूर करून त्याला क्षात्रधर्माला, युद्धाला प्रवृत्त करण्यासाठी किंवा कर्तव्यसन्मुख करण्यासाठी कृष्णाने जशी त्याला गीता सांगितली. तशी समाजाची संभ्रमित अवस्था नष्ट करून त्यांना धर्मकर्तव्य सन्मुख बनविण्यासाठी ज्ञानेश्वरांनी 'गीता' हा ग्रंथ विवेचनासाठी निवडून 'ज्ञानेश्वरी' सांगितली.

### ३.संत नामदेव

संत ज्ञानेदवांच्या समकालीन असणारे संत कवी म्हणून नामदेवांचा उल्लेख केला जातो. भक्तिपीठाचे आचार्य, पहिले भावकवी, आख्यानकवी, पद्यचरित्रकार, आत्मचरित्रकार, भागवत धर्माचे पहिले संघटक व प्रचारक, कीर्तन परंपरेचे प्रवर्तक, भक्तिमार्गाचा अंगिकार करणारे श्रेष्ठ भक्त इत्यादी नामाभिधानाने नामदेव परिचित आहेत. संत नामदेवांनी दशावतार वर्णन, हरिचंद्र ख्यान, श्रियाळा व्याख्यान, ध्रुवाख्यान इत्यादी आख्याने लिहिली. ज्ञानदेव, निवृत्ती, सोपान, मुक्ताबाई व चांगदेव यांची समाधी चरित्रे लिहिली. ज्ञानदेव, गोराकुंभार, जनाबाई व चोखामेळा यांची चरित्रे लिहिली. याचबरोबर

त्यांनी अडीच ते तीन हजार अभंगरचना केली आहे. त्यात आत्मचरित्रपर, आत्मनिवेदनपर, बाळक्रीडा व रूपक आणि तीर्थावळी असे त्यांच्या अभंगाचे स्वरूप आहे. शिखांच्या 'गुरूग्रंथसाहिबा' या ग्रंथात ही त्यांचे एकसष्ट अभंग समाविष्ट आहेत. 'नामदेवजी की मुख्यबानी' या नावाने ती हिंदी पदरचना ओळखली जाते. नामदेवांच्या अभंगाच्या शेवटी 'नामा म्हणे' अशी नाम मुद्रा आढळते तर कधी 'विष्णुदास नामा' अथवा 'केशवाचा नामा' असाही स्वतःचा उल्लेख ते करताना आढळतात.

नामदेवांच्या साहित्यात सुबोध व सरस भाषा आली आहे. परधर्म सहिष्णुता व सर्वसमावेशकता हे त्यांच्या साहित्याचे विशेष होत. याशिवाय प्रांजल निवेदन, हृदयंगम संवाद, नाट्यपूर्ण प्रसंग, जिवंत अनुभूती, स्वानुभाव, भाषा, प्रतिमा व रूपकांचा यथोचित वापर केल्याचे आढळून येते. मराठी अभंगात शिवाय ते हिंदीतही अभंगरचना करीत. याबद्दल यु.म. पठाण म्हणतात की, "नामदेवांची मराठी अभंगातील भक्तिकल्पनाही या हिंदी पदांत आविष्कृत झाली आहे तिच्यात उत्कट आर्त भावाचा, श्रद्धेचा नितळपणा आहे. कोवळीकता आहे."[१५] यावरून नामदेवांच्या अभंग रचनेचेही वैशिष्ट्ये लक्षात येतील त्यांच्या मराठी-हिंदी अभंगरचनेसंदर्भात डॉ. अशोक कामत यांनीही काही अभ्यासपूर्ण चर्चा केलेली आढळते. नामदेवांनी अभंगात विविध अनुभव आविष्कृत केलेले आहेत. याबद्दल डॉ. श.गो. तुळपुळे म्हणतात की, "नामदेव परमार्थातील समतावादी असून त्यांचा भक्तिमार्ग जाणते आणि नेमते अशा सर्वांकरिता आहे. इतर सर्व साधने व्यर्थ असून उत्कट भक्ती हेच परमार्थप्राप्तीचे एकमेव साधन होय अशी त्यांची श्रद्धा नव्हे, अनुभव होय."[१६] हे डॉ. शे.गो. तुळपुळे याचे म्हणणे एकदम ग्राह्य वाटते.

**४.संत मुक्ताई**

ज्ञानेश्वराची बहीण आणि महायोगी चांगदेवाची गुरू म्हणजे मुक्ताई ही या चार भावंडात सर्वात लहान मुक्ताबाई ही आपल्या भावांप्रमाणेच अलौकिक बुद्धिमत्तेच्या तेजाने आणि अधिकाराने प्रसिद्ध आहे. मुक्ताबाईची रचना पाहिली असता अध्यात्म व कवित्व या दोन्ही बाबतीत ती ज्ञानेश्वरांची आठवण करून देते. वारकरी संप्रदायाच्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानाची जी एक मांडणी आहे. त्या मांडणीतील शेवटची पायरी म्हणजे या मानवी जन्माची 'मुक्ती' होय. वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानानुसार प्रत्येक जन धडपडत असतो. तो मोक्षासाठी, मुक्तीसाठी. याचाच आधार घेऊन ज्ञानदेवादि भावंडांचा विचार केल्यास मोक्षापर्यंतची सुलभ वाट ही त्यांच्या नावातूनच स्पष्ट होते. 'निवृत्ती' म्हणजे विषयाची वृत्ती शून्यावर असेल तर माणसाला 'ज्ञान' प्राप्त करून घेता येते. ज्ञानामुळेच माणसाला भक्तीचा 'सोपान' चढून मुक्तीचे / मोक्षाचे दार ठोठाविता येते. पर्यायाने मानवी जन्माचे अंतिम ध्येय मोक्ष मिळविणे साध्य होते. या दृष्टीने मुक्ताबाईचे मोठेपण तात्वीक भूमिकेतून आपणास दिसून येते.

मुक्ताबाईचे अभंग, पदे, कल्याणपत्रिका व हरिपाठ अशी काही रचना असून ती अतिशय गोड आहे. मुक्ताबाई ही आपल्या भावंडाप्रमाणेच विद्वान असून त्यांच्यासारखी विरक्तवृत्तीने राहात होती. तरी सुद्धा तिच्या अभंगातून स्त्रियांच्या कोमलपणाच्या छटा दिसून येतात. मुक्ताबाई ही सर्व संतमंडळीत वयाने लहानच होती. पण तिचा पारमार्थिक अधिकार मोठा होता. त्यामुळेच की काय तिच्या बोलण्यात चालण्यात एक कर्तेपणाची ऐट दिसून येते. मुक्ताबाईला लाभलेल्या या दुहेरी अधिकारामुळे ती एक गोष्ट विसरून जाते की, आपण सर्वापेक्षा वयाने लहान आहोत आणि मग "सगुणभक्तीचा मुर्तीमंत आदर्श असणाऱ्या नामदेवांचे गर्व हरण करण्यास, चांगदेवांसारख्या वयोवृद्ध हटयोग्यास गुरूपदेश करण्यास व ताटी आड दडलेल्या दुखित, अपमानित ज्ञानेश्वरांचे सांत्वन करण्यास ती पुढे सरसावते ती त्यामुळेच."[१७] म्हणजेच मुक्ताबाई वयाने लहान असून ही ज्ञानियांच्या राजालाही उपदेश करते. हा उपदेश तिने आपल्या ताटीच्या अभंगातून केला आहे. ताटीचे अभंग हे एक प्रासादिक प्रकरणच आहे. ज्ञानदेवांचा काही टवाळखोरांनी अपमान केल्यानंतर ते आपल्या झोपडीचे दार बंद करून बसतात.

**सारांश**

वारकरी संप्रदायातील प्रमुख संत तुकारामांनी भागवत धर्म प्रसाराबरोबरच समाजास सुधारकाची महत्त्वाच्या भूमिका पार पाडली. आपल्या कवितेतून त्यांनी समाजातील अपप्रवृत्तीवर कडाडून हल्ला केला. 'बुडती हे जन न देखवे ना डोळा' या कळकळीतून समाजाचा उद्धार करण्याचा प्रयत्न केला. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ त्याच्या सांस्कृतिक कार्याची वीणा त्यांनी आपल्या खांद्यावर घेतली. साऱ्या समाजाला नीतिमूल्यांची आठवण तुकारामांनी करून दिली. जातिव्यवस्थेला विरोध केला. समाजमनातील अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न केला. तुकारामांचे समाजोद्धाराचे कार्य या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. ज्ञानदेवांनी समानता आणि मानवता या मूल्यांचा वारकरी संप्रदायाला आधार दिला. नामदेव, एकनाथ आणि तुकाराम यांनी या मूल्यांचा आपल्या प्रत्यक्ष आचरणाने अनुभव देऊन जनसामान्यात ही मूल्ये रूजविण्याचा प्रयत्न केला. वारकरी संप्रदायाला समाजव्यापी धर्म करण्याचे मोलाचे कार्य या संप्रदायाने केले. जातिभेद या संप्रदायाने भक्तिपरंपरेच्या संदर्भात दूर केले. तसेच धर्माचे भेदही दूर सारले. निर्मळ भक्तिभावाने आलेल्या समाजाच्या सर्व थरातील माणसांना या संप्रदायाने एकत्र आणण्याचा महत्त्वाचा प्रयत्न केला. त्यामुळे वारकरी संप्रदायाच्या सामाजिक व सांस्कृतिक चळवळीचे आणि समाजप्रबोधनाचे महत्त्व लक्षात येऊ शकते.

**संदर्भग्रंथ**

१. पेंडसे एस.डी., वैदिक साहित्यातील भागवत धर्माचा विकास १९६५ प्राचीन साहित्याचा इतिहास
२. बहिरट भा. प., वारकरी संप्रदाय उदय व विकास, व्हिनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९७२,
३. दांडेकर शं. वा., वारकरी संप्रदायाचा इतिहास, दांडेकर प्रकाशन, पुणे, प्रथामावृत्ती १९२७
४. गोसावी र. रा., पाच भक्तिसंप्रदाय, मोगे प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९७४,
५. फडकुले निर्मलकुमार, संतकवी तुकाराम: एक चिंतन, सुविधा प्रकाशन, सोलापूर, द्वितीयावृत्ती २००२
६. सरदार गं. बा., संत साहित्याची सामाजिक फलश्रुती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८२